maharashtratimes.com | www.mtonline.in

# महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । गुरुवार, ५ मार्च २०१५ । पाने १२ + मुंबई टाइम्स । शहर आवृत्ती * । ₹ ४.०० किंवा ६.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित











जागतिक महिला दिनानिमित्त फोटो सर्कल सोसायटी व ठाणे महानगरपालिका यांच्यातर्फे तीन दिवसीय 'विद्युल्लता २०१५' छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. फोटो सर्कल सोसायटीच्या १२ महिलांनी काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन ६ ते ८ मार्च दरम्यान ठाणे कलाभवन येथे भरणार आहे. प्रदर्शनाचे यंदाचे चौथे वर्ष आहे. शुक्रवारी, ६ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता ठाणे जिल्हाधिकारी डॉ. अश्विनी जोशी यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. जव्हारमधील ज्येष्ठ समाजसेविका प्रमिला कोकड प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. ७, ८ मार्च रोजी सकाळी १० ते रात्री १० या वेळेत ते खुले असेल.



